पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
e-mail :sp.washim@mahapolice.gov.in Website:www.washimpolice.gov.in

## प्रेस नोट

दिनांक :– १५/०६/२०२४

### बकरी ईद चे पार्श्वभुमीवर जनावर चोरी करणारे गुन्हेगारांना अटक वाशिम पोलीस दलाची प्रभावी कारवाई..

मा. पोलीस अधिक्षक श्री.अनुज तारे यांनी वाशिम जिल्हयातील सर्व प्रकारचे अवैध धंदे व चोऱ्या करणाऱ्या इसमांवर प्रभावी कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामध्ये विशेषत: शेती संबंधाने चोरी करणाऱ्याविरुध्द प्रभावी व कठोर कार्यवाहया करण्याच्या दृष्टीने गुन्हेगारीस आळा घालण्याकरीता सर्व ठाणेदारांना आदेशित केले आहे. बकरी ईद चे पार्श्वभुमीवर मा. पोलीस अधिक्षक श्री.अनुज तारे यांनी जिल्हयामध्ये होत असलेल्या चोऱ्या तसेच जनावर चोरीचे गुन्हे उघड करणे व गुन्हयांना आळा घालण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी यांना दिले.

वाशिम जिल्हयामध्ये जनावर चोरी करणारे गुन्हेगार सक्रीय असल्याने त्यांना पायबंध घालण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेला सुचना दिल्या. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार जनावर चोरी करणारे गुन्हेगारांची गोपणीय माहिती काढली, काळया रंगाचे फोर्ड इन्डेवर वाहन क्र.एम.एच.३१ सि.एन.७०६५ या वाहनामधील मागच्या सिट काढुन वाहनाला काळया फिल्म लावुन सदर वाहनामध्ये जनावरांना कोंबुन नेवुन त्यांची कटाई करतात अशी माहिती मिळाल्याने सदर माहितीच्या आधारे अकोला जिल्हयातील महान येथे जावुन कसोशीने प्रयत्न करुन आरोपींचा शोध घेतला जनावर चोरी करणारे तिन आरोपींना ताब्यात घेण्यात आले १) अब्दुल मतिन अब्दुल नबी, वय ३० वर्ष, रा.महान २) शेख अक्रम शेख मोहम्मद, वय २२ वर्ष, रा.अकोट ३) शेख अलीम शेख महेमुद, वय ४० वर्ष रा.महान त्यांचे सोबत काळया रंगाचे फोर्ड इन्डेवर वाहन क्र.एम.एच.३१ सि.एन.७०६५ या वाहनामधील मागच्या सिट काढुन त्यामध्ये दोन गायी व एक वासरु कोंबुन होते. सदर दोन गायी व एक वासरु ची सुटका करुन वैद्यकीय तपासणी करुन गोरक्षण संस्थाणचे आरक्षणात दिले आहे.

नमुद तिन्ही आरोपींना वाहनासह ताब्यात घेवुन स्थानिक गुन्हे शाखा वाशिम येथे आणुन विचारपुस केली असता त्यांनी वाशिम जिल्हयातील वाशिम, रिसोड, मालेगाव, जउळका, शेलुबाजार, मंगरुळपीर या भागातील जणावरे चोरुन नेले असल्याबाबत कबुली दिली आहे. ताब्यात घेतलेल्या आरोपींविरुध्द प्रभावी कारवाई करण्यात येत आहे.

मा. पोलीस अधिक्षक श्री. अनुज तारे यांनी जनतेस आवाहन केले की, वाशिम जिल्हयात अशा प्रकारच्या चोऱ्या करणारे, गुंडगिरी करणारे, अवैध धंदे करणाऱ्या इसमाविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल. अवैध हातभट्टी दारुवाल्यांविरुध्द प्रभावी धाडी व प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे उद्दीष्ठ ठेवले आहे. त्या दृष्टीने गुन्हेगारीस आळा घालण्याकरीता सन २०२४ मध्ये एकुण ०८ लोकांवर एम.पी.डी.ए.ची प्रभावी कारवाई करुन त्यांना जिल्हा कारागृहात स्थानबदध करण्यात आले आहे. एम.पी.डी.ए. च्या एवढया मोठया प्रमाणात व प्रभावी कारवायामुळे नव्याने गुन्हेगार गुन्हे करण्यास धजावणार नाहीत गुन्हेगारीस आळा बसेल याकरीता प्रभावी कारवाया, धाडी पोलीस दलाकढुन करण्यात येत आहे. यापुढेही कार्यवाही सत्र असेच सुरु राहणार असल्याचा संदेश मा.पोलीस अधिक्षक श्री. अनुज तारे यांनी दिला आहे.

सदर जनावर चोरी करणारे गुन्हेगारांना अटक करण्याची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. अनुज तारे, अपर पोलीस अधिक्षक श्री.भारत तांगडे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण महल्ले, पोलीस निरिक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश धोत्रे, पोहेकॉ. विनोद सुर्वे, राजेश राठोड, आशिष बिडवे, नापोकॉ ज्ञानदेव म्हात्रे, पोकॉ अविनाश वाढे यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम